# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pr&o.cp.mb-vv@mahapolice.gov.in


सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३६-२३** **दिनांक ०१/०२/२०२३**

## कंपनी परिसरातील तसेच चालु बांधकामाच्या ठिकाणी लोखंडी साहित्याची चोरी करणा-या आरोपीतांस अटक- गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे हद्दित दिनांक ०५/०१/२०२३ रोजी रात्री ०९.०० वा. ते दिनांक ०६/०१/२०२३ रोजी सकाळी ०८.३० वा. चे दरम्यान टिवरी गाव, नायगाव पुर्व येथुन ब्रिज बांधकामासाठी वापरण्याते येणारे एम एस प्लेट, व्हर्टिकल, लेझर, सोल्जर, बेस जॅक असे एकुण ८३,०००/- रुपये रक्कमेचे लोखंडी साहित्य हे चोरीस गेल्या बाबत फिर्यादी गनी मोहम्मद मेमन वय ४६ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणेत दिनांक ०८/०१/२०२३ रोजी गुन्हा रजि. नं. ३२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९, ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये कंपनी परिसरातील तसेच चालु बांधकामाच्या ठिकाणी रात्री - अपरात्री लोखंडी वस्तुंच्या चोरीच्या गुन्हयांच्या प्रमाणात दिवसें दिवस वाढ झाल्याने वरिष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष २, वसई मधील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक आणि गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने आरोपीत नामे १) आसिक सलाम खान, वय ४५ वर्षे, रा. मनवेलपाडा तलावाच्या बाजूला मोरेगाव नालासोपारा, २) अब्दुल कलाम सलाम खान, वय-४६ वर्षे, रा. कुर्ला जरीमरी ९० फिट रोड, ३ नं खाडी, साकीनाका, मुंबई, ३) मोहम्मद कासिम मोहम्मद हसन खान वय- ४९ वर्षे रा. शालीमार हॉटेल पाठीमागे वालीव वसई पूर्व ४) सज्जनअली अहमद रसीद, वय २६ वर्ष, रा. मिलींद नगर चाळ, तुलसी पाडा, भांडुप पश्चिम, मुंबई यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. तपासादरम्यान नमुद अटक आरोपीत यांच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी खालील गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे:-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि व कलम |
|---|---|---|
| १) | वालीव | ३२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| २) | वालीव | ८४/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ३) | वालीव | १४२२/२०२१ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ४) | पेल्हार | ६०/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ५) | पेल्हार | १९७/२०२१ भा.द.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| ६) | वसई | ३६५/२०२२ भा.द.वि.सं.कलम ४५७, ३८० प्रमाणे |

नमुद आरोपीतांकडुन गुन्हयातील चोरलेले लोखंडी साहित्य, गुन्हा करणेकरीता वापरलेले वाहन  असा एकुण ६,४७,६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी  सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, दादा आडके, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे यांनी केली आहे.




———ooo———